# छात्र प्रबोधन - कार्यसंकल्प (शके १९३८-३९ / इ. स. २०१७-२०१८)

## भवितव्य लेखासंदर्भातील संकल्प

### अ) एकदा करायचे उपक्रम -

१) एकूण १० पुस्तकांचे नव्याने प्रकाशन होईल, त्यातील २ पुस्तके शालेय स्तरावरील नेतृत्व विकसनाशी निगडित असतील.

२) रौप्य महोत्सवी सांगता समारंभाचे आयोजन केले जाईल.

३) २५०० गुणवंत कुमारांचा शोध घेऊन त्यांना मासिकाचे वार्षिक सभासदत्व मोफत दिले जाईल.

### आ) नियमित प्रासंगिक उपक्रम -

१. मासिकाच्या आशयाशी किंवा परिणामांशी निगडित १ संशोधन प्रकल्प केला जाईल.

२. वार्षिक संयोजक प्रशिक्षण शिबिर घेण्यात येईल. त्यातून १२ शाळांमध्ये प्रबोधन तासिका सुरू होतील.

३. १५ ठिकाणी कुमार साहित्य मेळाव्यांचे आयोजन केले जाईल.

४. कुमारांसाठीची दिनदर्शिका प्रकाशित केली जाईल.

५. विभागस्तरावर अथवा राज्यस्तरीय कुमार साहित्य संमेलनासाठी आयोजकांचा पाठपुरावा व आयोजनासाठीचे साहाय्य केले जाईल.

६. अन्य संस्थांच्या संयुक्त विद्यमाने अभिवाचन व हस्तलिखित स्पर्धांचे राज्यस्तरीय आयोजन केले जाईल.

७. बालकुमार वयोगटासाठी निघणाऱ्या नियतकालिकांच्या/पुरवण्यांच्या संपादकांचा मेळावा/परिसंवाद/चर्चासत्र यांचे आयोजन केले जाईल.

### इ) नियमित नित्य उपक्रम -

१. २ विशेषांकांचे प्रकाशन होईल व २ लेखमाला प्रसिद्ध केल्या जातील.

२. ग्रामीण द्वैमासिक आवृत्ती प्रकाशित केली जाईल.

३. इंग्रजी त्रैमासिक आवृत्ती प्रकाशित केली जाईल.

४. संकेतस्थळाद्वारा विद्यार्थ्यांचे १ ‘ई गट’ स्थापन करून त्यांच्याबरोबर मासिक संवाद वाढवला जाईल.

५. मासिकाच्या माजी सभासद /शिबिरार्थींची त्रैमासिक संपर्काची रचना कार्यान्वीत होईल.

६. महाराष्ट्र व गोवा मिळून छात्र प्रबोधनची ११० वितरण केंद्रे कार्यरत होतील.

## नित्य कामासंदर्भातील संकल्प

१. छात्र प्रबोधनच्या वाटचालीचा विस्तृत अहवाल तयार केला जाईल. त्याचबरोबर चित्रफीत तयार केली जाईल.

२. मराठी, इंग्रजी व ग्रामीण दिवाळी अंक प्रकाशित केले जातील.

३. किमान ५ विभागांशी साहचर्य वाढवले जाईल.

४. विभागातील सदस्यांसाठी ६ उपक्रमांचे आयोजन केले जाईल.

५. विभागातील सदस्यांच्या गुणवत्तावाढीसाठी २ कार्यशाळा होतील.